**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०६**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :३०/०८/२०१६

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०६ शनिवार दि. ०३/०९/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शनिवार दिनांक- ०३/०९ /२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७९ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक- ०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ८० | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता म.न.पा. हद्दीतील घनकच-याचे व जादा लोकसंख्याच्या ठिकाणी जमा होणा-या कचरा कुंडीवरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणेकरीता मंजूर निविदाकार यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८१ | अर्जदार श्री. मोहन वसंत शेळके, यांनी मिस्कीन मळा येथील गंगाउदयान बाहेरील बांधलेल्या गाळयालगतची मोकळी जागा १५X२० फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८२ | पर्यटनासाठी पायाभुत सुविधा सन २०१५-२०१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१४०२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.२१३/२,२०६/१ ब,/१अ/१ब/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८३ | अहमदनगर महानगरपालिकेचे विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे बाबतच्या कामांची फेर निविदा क्र.३ ई -निविदा क्र.१४१९ या निविदेच्या दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ८४ | मा. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ बाबत लाभार्यीचे सर्वेक्षण करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे साठी ई- निविदा १३९९ अन्वये मागविण्यांत आलेल्या ई- निविदेचा लिफाफा क्र.२ मधील दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीस्तव ऑफिस रिपोर्ट. |
| ८५ | मा.न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतिने दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांची पॅनलशिप मानधनावर नियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- ७९ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक- ०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ८० ते ८५ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ७९ शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक- ०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक- ०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब - मागील सभेचे इतिवृत्त वाचन करा.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.सौ. छाया तिवारी :- मागील इतिवृत्तावर ज्या सदस्यांना चर्चा करावयाची असेल त्यांनी चर्चा करावी.अथवा इतिवृत्त मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- अमरधाम येथे गाळे धारकांना वाढीव जागा देण्यात आली आहे त्याची माहिती दया.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- १२ मार्च १६ रोजी महासभेमध्ये शिवसेनेच्या ४ नगरसेवकांनी प्रस्ताव ठेवून अमरधाम गाळयामागे ६ फुट जागा वाढवून देणे बाबत चा विषय मंजूर झाल्यानुसार वाढीव बांधकाम करण्यास मंजूरी देण्यात आली.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हा विषय अजेंडयावर होता का ? त्याचा ऑफिस रिपोर्ट वाचा.लहान मुल जिथं दफन करतात ती जागा आहे ही.

मा.श्री.मुदस्सर शेख :- त्यांना बांधकाम परवानी दिली आहे का ?

उपायुक्त श्री.बेहेरे :- ठरावातच म्हटलं आहे की, गाळेधारकांनी आपल्या खर्चाने जागा बांधून घ्यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- लहान मुलं जिथ दफन करतात तिथ तुम्ही जे.सी.बी.फिरवून नागरीकांच्या भावनांशी खेळता आहात.माझ्याकडे व्हिडीओ शुटींग आहे.लहानमुलं जिथ दफनविधी करतात तिथ कॉलम टाकून बांधकाम चालू आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- अमरधाम कंपौडलगत गाळेधारक यांना सदर गाळे जागा भाडेधारकांना कराराने दिली आहे.त्यांना आतील बाजूस ६ फुट जागा वाढवून देणे बाबत ठराव झाला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ही जागा अमरधामसाठी आहे.आणि तुम्ही तिथं बांधकाम करायला जागा देता.टाउनप्लॉनरला वाचायला सांगा.

मा.श्री.सभापती साहेब :- फक्त एक गाळेधारकाने जागा वाढवून मिळणे बाबत अर्ज केला होता.

मा.श्री.गणेश भोसले :- जागा वाढवून मिळणे बाबत कोणत्या गाळेधारकांनी मागणी केली? त्यांचा अर्ज आहे का?

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- गाळा क्र.१ ते २१ गाळेधारकांनी जागा वाढवून मिळणे बाबत अर्ज केला होता.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नगररचनाकार यांनी माहिती दयावी.या बाबत प्रशासनाने ठोस भुमिका घ्यावी. नगररचनाकार यांनी सांगाव की,लहान बालकांचा दफन विधी कुठे करायचा.कुणाची मागणी नाही.या ठिकाणी झालेले बांधकाम ताबडतोब पाडून टाकावे.

मा.सभापती साहेब :- हा सर्वाचा विषय आहे.येथे कोणताही नगरसेवक मंजूरी देणार नाही.ताबडतोब बांधकाम पाडून टाकाव.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आपण टिपणी देतांना म्हणतो की,हे मान्य करावं पण आयुक्तांच्या मान्यतेशिवाय आपण विषय फायनल करीत नाही.

मा.सभापती साहेब :- आपण त्याचं व्हॅल्युएशन काढून देतो.रिपोर्टवर निगेटिव्ह शेरा देतो,असे दुटप्पी पणाने प्रशासनाने वागू नये.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- आपण गाळेधारकांना नोटीस इश्यु केली आहे की,ताबडतोब बांधकाम थांबवाव.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- गाळेधारकांनी बांधकाम कशाच्या आधारे केले आहे.आपण त्यांना काय दिले.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- त्यांचे डिपॉझीट भरून घेतले आहे.झालेल्या चर्चेप्रमाणे फेरसादर करून मा.आयुक्तांची मंजूरी घेतो.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- विशाखापट्टणम हा नॅशनल हायवे शहरातून गेला त्यामुळे गाळे जाणार आहेत.म्हणून त्यांनी पूर्वनियोजीतपणे गाळे आतुन वाढविण्याचे काम चालू केले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- माच्या अजेंडयावर जे विषय होते त्यांनाच मंजूरी दया.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अजेंडयावरचे विषयांना फक्त मंजूरी दया.चर्चा होवून मंजूरी करीता आलेल्या विषयांना मंजूरी देण्यात येवू नये.

मा.सभापती साहेब :-श्री.बोराटे व श्री.सातपुते साहेब यांनी रसिक कोठारी यांना किती कामे दिले.कामे कोणत्या स्थितीत आहे याची महिती दयावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ज्या कामांची मुदत संपली तरी काम पुर्ण झाले नाही.ती कामे रिकॉल करा,निधी नही ,कामे होत नाही.हा फक्त काम घेतो.

मा.सभापती साहेब :- किती कोटींचे कामे आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- रिकॉल करणेबाबत ज्या ठेकेदारांनी कामात टाळाटाळ केली त्यांनी काय पत्रव्यवहार केला ते पहावे. रू४० कोटींची कामे मंजूर झाले वर्कऑर्डर झाल्या ज्यांचे काम चालू आहे.पी.एम.सी.वाला सकळयात मोठा झाला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ३ते ४वर्षापासुन कामे घेवून ठेवतात.

मा.सभापती साहेब :- काही टेक्नीकल अडचण असेल तर सांगा,कामे पेंडीक कशामुळे आहेत ते पहा.

मा.श्री.गणेश भोसले :- नविन अधिका-यांची ओळख सांगा.

मा.उपायुकत श्री.बेहेरे :- वर्ग -२ मध्ये सहाय्यक आयुक्त म्हणून श्री.विक्रम दराडे म्हणून आहेत.त्यांचे काम समन्वय अधिकारी म्हणून सर्व डिपार्टमेंटचे काम पहातील.

बांध.विभाग श्री.निंबाळकर :- रू.४० कोटी व्यतीरीक्त रू.२६ कोटींचे कामे पेंडींग आहेत.

मा.सभापती साहेब :- कामाचे नांव,किती वेळा मुदवाढ दिली ते सांगा.

मा.श्री.गणेश भोसले :- अर्धवट काम वाल्यांना रिकॉल करायच का ?

मा.श्री.मुदस्सर शेख :- डिपॉझिट जप्त करा.

मा.श्री.गणेश भोसले :- ज्या कामामध्ये पैसे मिळतात ते काम करतात,बाकीची कामे तसेच पडतात.

श्री.पारखे :- भुतकरवाडी ते पंपींग स्टेंशन चे काम चालू आहे.तिथून पुढे सत्यम हॉटेल पर्यतच काम चालू आहे.मुदतवाढ दिलेली आहे.मार्कीग करणे,अतिक्रमण काढणे यामध्ये वेळ गेला.

मा.श्री.अनिल बोरूडे :- कृषी खात्याच्या पुढचं कामाचे काय ते सांगा.

श्री.पारखे :- मुदतवाढ दिलेल्याची मुदत कधी संपली ते पाहून सांगतो.

मा.सभापती साहेब :- त्याच्याकडून काम काढून घेउन दुस-याला देउ. पारखेनी काम वाचून दाखवले.

मा.श्री. दिलीप सातपुते :- उरमुडे इले. ला काम दिले आहे. केडगाव पुले ते देवी मंदिर रोडपर्यत आहे.

मा.सभापती साहेब :- आज दि.३/९/२०१६ पासून १५ दिवसात काम पुर्ण झाले नाही तर ते काम रद्द समजण्यात यावा. असा नोटीस दयावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ३ कोटी ३० लाखच्या कामाचे एल.ई.डीचे बिल का दिला नाही.

मा.श्री. दिलीप सातपुते :- अडीच कोटीच बिल दिले आहे. रू.७५ लाखाच बिल बाकी आहे.आणि त्याची १ प्रत स्थायी समितीला व १ प्रत अनिल बोरूडे यांना दयावी. पुढच्या स्टॅण्डींग मध्ये पुर्ण माहिती दयावी.

मा.सौ. सुनिता भिंगारदिवे :- आमच्या इकडे सगळया टयूब गेल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- सातपुते साहेब आमच्या ताईनी जे काम सांगितले ते ताबडतोब करून दया. त्वरीत काम करून दया.

मा.सौ. छाया तिवारी :- सिध्दार्थनगर येथे लालटाकी भागात लाईट नव्हती तिथे खुप भांडण झाली.

मा.श्री. गणेश भोसले :- सावळेचा चार्ज शेंडगेला दिला. त्यांचा इंचार्ज सातपुते साहेब आहे.

मा.सौ. छाया तिवारी :- नागरिकांची आपल्या कडून ३चे अपेक्षा आहे. लाईट , पाणी , स्वच्छता बॅक ऑफ बडोदा कॉलनी मध्ये या सुविधा नाहीत.

मा.श्री. गणेश भोसले :- गणपती विसर्जन मिरवणुकी रोडवर फक्त पॅचींग करतात. मोहरम व गणपतीच्या वेळी दर वेळेस तिथेच का ? लाईट जाते, पॅचींग करावे लागत. आनंदऋषी रोडवर किती मोठ पॅचींग करायच ते मी सांगितले दरवर्षी मिरवणुक रोडवर पॅचींग व लाईटसाठी लाखो रूपये खर्च होतात. उपनगरामध्ये तुम्ही कामच करत नाही चेअरमन साहेब १ गाडी घ्या. तुम्ही २ ,२ लाख रूपये नुसत भाडे देता.

मा.उपायुक्त साहेब श्री. बेहेरे :- घसारा निधी मध्ये तरतुद आहे.

मा.श्री. गणेश भोसले :- हे फक्त शेरे मारतात. याच्याकडून त्याच्याकडे फाईल फिरत राहते.

मा.सभापती साहेब :- मागच्या वेळेलाच ठरले होते. गाडी घ्यायची तुम्ही काय शेरे मारत राहता.

मा.उपायुक्त साहेब श्री. बेहेरे :- सगळया गोष्टी नमूद आहे.

मा.श्री. गणेश भोसले :- सभापती तुमचा कालावधी संपले तरी गाडी येणार नाही. कचरा रोडवर पडला मी पेपर घेउन आलो आहे.

मा.सभापती साहेब :- गाडी घेण्यात यावी. असा शेरा सगळयांनी दिला मग सहया का होत नाही अतिरिक्त आयुक्त का सहया करत नाही.

मा.उपायुक्त साहेब श्री. बेहेरे :- ज्या गोष्टींचा खुलासा मागीतला तर सगळया गोष्टी त्यात लिहिला आहे.

मा.सभापती साहेब :- अतिरिक्त आयुक्तांना सभेत बोलवा, जर एखादा आयुक्त चुकीचे शेरा मारत असतील तर त्याच्यावर कार्यवाही करून आम्ही निलंबित करू शकतो.

मा.श्री.दिलीप सातपुते :- फेरसादर अहवालाप्रमाणे घसारा निधी मध्ये शिल्लक तरतुदीनुसार बजेटमध्ये तरतुद करावी लागेल.

मा.श्री. गणेश भोसले :- बजेटपर्यत तुम्हाला थांबाव लागेल.

मा.उपायुक्त साहेब श्री. बेहेरे :- घसारा निधीमध्ये रू.५६ लाखाची रक्कम शिल्लक आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- त्यांच्या सहीची गरज आहे का ?

मा.उपायुक्त साहेब श्री. बेहेरे :- आयुक्तांनी त्यांना अधिकार दिले आहेत.

मा.सभापती साहेब :- आम्ही ८ दिवसांनी प्रत्येक विभाग प्रमुखाची बैठक घेणार आहोत दर आठवडयाच्या बुधवार दुपारी ३.०० वा घेणार आहोत आठवडा बैठकीला प्रत्येक विभाग प्रमुखांनी हजर राहणे गरजेचे आहे. असा ठराव करून घ्या.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- पुढच्या सभेमध्ये महिलांसाठी माईक ची व्यवस्था करावी.

मा.श्री.मनोज दुलम :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- मा.स्थायी समिती सभा सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक- ०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्याकार्यवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधिल ३. (अ) या अधिनियमान्वये दर बुधवारी स्थायी समिती आढावा बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक-०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्याकार्यवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधिल ३. (अ) स्थायी समितीची सभा आठवडयातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरविण्यात आली पाहिजे.प्रत्येक आठवडयाला स्थायी समितीमध्ये विषय असतील असे नाही. मागील सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार व ठरावाच्या अंमलबजावणी बाबत तसेच महानगरपालिकेच्या कामाकाजाची आढावा बैठक प्रत्येक महिन्याच्या दर बुधवारी दुपारी ३.००वा आयोजित करण्यात यावी. बुधवारी जर सार्व.सुट्टी असेल तर हि बैठक गुरूवारी होईल. या बाबत सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांना आजच बैठकीस उपस्थीती बाबतचे आदेश देण्यात यावेत.

**ठराव :-** सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक २५/०४/२०१६ , सभा क्रमांक- ०२ मंगळवार दिनांक १०/०५/२०१६ , सभा क्रमांक-०३ दिनांक ३०/०५/२०१६ व सभा क्रमांक-०४ दिनांक ०४/०६/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम मंजूरी देण्यांत येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ मधिल ३. (अ) स्थायी समितीची सभा आठवडयातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरविण्यात आली पाहिजे.या अधिनियमानुसार महानगरपालिकेच्या कामाकाजाची आढावा बैठक आपण प्रत्येक महिन्याच्या दर बुधवारी दुपारी ३.००वा आयोजित करण्यात यावी. बुधवारी जर सार्व.सुट्टी असेल तर हि बैठक गुरूवारी होईल. या बाबत सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांना बैठकीस उपस्थीती बाबतचे आदेश देण्यात यावेत.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६

विषय क्रमांक- ८० शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अ.नगर म.न.पा. घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता म.न.पा. हद्दीतील घनकच-याचे व जादा लोकसंख्याच्या ठिकाणी जमा होणा-या कचरा कुंडीवरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणेकरीता मंजूर निविदाकार यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा घनकचरा व्यवस्थापन

**संदर्भ :-** मा.आयुक्त साहेब यांची दि.१५/०७/२०१४ रोजीच्या दर मंजुरीनुसार

मा.फेरसादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, अ.नगर मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता मनपा हददीतील घनकच-याचे कचरा संकलन वाहतूक करणेकरीता प्रति ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेकरीता दर निश्चिती भाडे तत्वावर वाहने उपलब्ध करून घेणेबाबत देय दराच्या ऑन लाईन ई - निविदा क्र.७१२ दि.१३/०५/१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर प्रक्रियेतील प्राप्त कमी दराच्या निविदाकार अश्वमेघ असोसिएट यांच्या दरास मा.आयुक्त साहेब यांच्या दि. १५/०७/१४रोजीच्या मंजूरीने सदर संस्थे बरोबर दि. १६/०७/१४ रोजी एक वर्षाकरीता करारनामा होवून सदर एजन्सीस घ.क.व्य. जावक क्रमांक ०६ दि. ०१/०४१५ अन्वये खालील प्रमाणे कार्यांरभ आदेश देण्यात आले होते.

| अ. नं. | प्रभाग समिती कार्यालय | वाहन संख्या | प्रभाग अधिकारी यांची मागणी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती कार्या. क्र.१ | १ | दि.२३/०३/२०१५पासून चार महिने |
| २ | प्रभाग समिती कार्या. क्र.३ | २ | दि.२३/०३/२०१५पासून चार महिने |
| ३ | प्रभाग समिती कार्या. क्र.४ | १ | दि.१६/०३/२०१५पासून चार महिने |
| ४ | प्रभाग समिती कार्या. क्र.४ (केडगाव) | २ | दि.२३/०३/२०१५पासून चार महिने<br>दि.१६/०३/२०१५पासून चार महिने |

त्याप्रमाणे संबंधीत प्रभागामध्ये खाजगी ट्रॅक्टर्स चालू आहेत. परंतू एजन्सीस देण्यात आलेल्या कार्यांरभ आदेशातील चार ट्रॅक्टर्सची दि. २२/०७/१५ रोजी मुदत संपलेली आहे व दोन ट्रॅक्टर्सची मुदत दि. १५/०७/१४ रोजी संपली. मात्र संबंधीत प्रभागाने मुदत संपल्यानंतर ही खाजगी ट्रॅक्टर्सचा वापर चालुच ठेवला व त्यानुसार दि. २१/०७/१५ रोजी चार महिने मुदतवाढीकरीता प्रस्ताव सादर करण्यात आले होते.मात्र तद्नंतर सदरची मुळ नस्ती गहाळ झाल्याने नियमानुसार नस्ती गहाळ झालेबाबत प्रस्ताव सादर करून सदर कुठेही आढळुन आली नाही त्यानंतर दि. २८/०१/१६ रोजी तोफखाना पोलीस स्टेशन , अहमदनगर येथे वस्तु गहाळ रजि. नंबर २४६ /२०१६ प्रमाणे तक्रार नोंदविण्यात आली मात्र सदर नस्ती पुन्हाश्चः शोध घेतले असता दि. ०४/०२/१६ रोजी सदरची मुळ नस्ती सापडली व त्यानुसार पंचनामा करून पोलीस स्टेशनला नोंदविलेली तक्रार मागे घेण्यात आली आहे.

मात्र भाडोत्री चार ट्रॅक्टर्सची दि. २२/०७/१५ रोजी व दोन ट्रॅक्टर्सची मुदत दि. १५/०७/१४ रोजी मुदत संपलेली होती मात्र मुदतवाढ घेण्याकरीता प्रभाग अधिकारी यांच्या मार्फत प्राप्त होणा-या मागणी अहवाला उशीरा प्राप्त झाल्याने प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाला असुन सदरील काम हे आरोग्य दृष्ट्या महत्वाचे असल्याने मनपाचे वाहन कचरा संकलन व वाहतुकीस कमी पडत असल्याने तसेच मा.नगरसेवकांच्या मागणी नुसार व कचरा उचलण्यात न आल्यास मा.नगरसेवकांचे व नागरिकांचे तक्रारी वाढ होण्याची शक्यता असल्याने मुदतवाढ न घेता काम सुरूच ठेवण्यात आले आहे.

मात्र सदरचे चार भाडोत्री ट्रॅक्टरचे दिनांक २२/०७/२०१५ पासून व दोन भाडोत्री ट्रॅक्टरचे दिनांक १५/०७/२०१५ पासून काम सुरूच ठेवण्यात आल्याने सदरील दिनांकापासून खाजगी ट्रॅक्टर्सने काम केल्यामुळे कामास कार्यात्तर मंजुरी घेवुन मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने व प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक प्रभाग समिती कार्या.क्र.१,३ व ४ यांच्या खालील मागणीनुसार कार्यारंभ आदेशीत करणे उचित राहील.

| अ. नं. | प्रभाग समिती कार्यालय | वाहन संख्या | प्रभाग अधिकारी यांची मागणी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती कार्या. क्र.१ | १ | दि.२२/०७/२०१५पासुन दि.३०/०५/२०१६ अखेर पर्यत |
| २ | प्रभाग समिती कार्या. क्र.३ | २ | दि.२२/०७/२०१५पासुन दि.३०/०५/२०१६ अखेर पर्यत |
| ३ | प्रभाग समिती कार्या. क्र.४ | १ | दि.१५/०७/२०१५पासुन दि.३०/०५/२०१६ अखेर पर्यत |
| ४ | प्रभाग समिती कार्या. क्र.४ (केडगाव) | २ | दि.२२/०७/२०१५पासुन दि.३०/०५/२०१६ अखेर पर्यत<br>दि.१५/०७/२०१५पासुन दि.३०/०५/२०१६ अखेर पर्यत |

वरील प्रमाणे चार भाडोत्री ट्रॅक्टर्सला दि. २२/०७/१५ पासुन व दोन भाडोत्री ट्रॅक्टर्सला दि.१५/०७/१५ पासुन सदर प्रस्ताव मंजुरी व कार्यांरभ आदेशापर्यत कार्योत्तर मंजुरीस व पुढील खालील प्रमाणे दि.३०/०५/१६ अखेर पर्यत मंजुरीस व येणा-या खर्चास मंजुरीस्तव सविनय सादर.

तद्नुसार चार ट्रॅक्टर्सची दि. २२/०७/२०१५ पासुन दि. ३०/०५/२०१६ अखेर पर्यत असे एकुण १२५६ कामाचे दिवस महिन्याकरीता व दोन ट्रॅक्टर्सची दि. १५/०७/२०१५ पासुन दि. ३०/५/२०१६ अखेर पर्यत ६४२ कामाचे दिवस मुदतवाढ देणे क्रमप्राप्त आहे. मंजुर ई - निविदा दर प्रति ट्रॅक्टर प्रति दिवस रक्कम रू.२५२०/- (ड्रायव्हर इंधनसह) याप्रमाणे एकुण सहा ट्रॅक्टर एकुण १८९८ कामाचे दिवस उलपब्ध करून घेतल्यास अंदाजे एकुण खर्च रक्कम रूपये ४७,८२,९६०/- (सत्तेचाळीस लाख ब्याअंशी हजार नउशे साठ रूपये) खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१५-२०१६ च्या वार्षिक प्रस्तावीत बजेट मध्ये माहे फेबुवारी २०१६ कालावधीत लेखा शिर्षक-खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे या प्रस्तावीत बजेट हेड मध्ये प्रस्तावीत बजेट रक्कम शिल्लक नसल्याने सन २०१६-२०१७ मधील प्रस्तावीत बजेट मधुन खर्च प्रस्तावीत करण्यात आले आहे.

तसेच संपुर्ण शहरातील खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक करणेकरीता ई - निविदा क्र.१०५२ ची फेर ई - निविदा क्र.१३४० प्रसिध्द करून पुढील प्रक्रिया चालु असुन सदरचा ठेका घेल्यास प्रस्तावीत केलेल्या भाडोत्री ट्रॅक्टर्स पुरविणे, वाहन चालक पुरविणे तसेच डंपर पुरविण्याचा ठेका व सदरचा कार्यारंभ आदेश रद्द करण्यात येईल या अटीस अधिन राहुन सन २०१४-१५ या वर्षाकरीत मंजुर दरानुसार सदर एजन्सीस वरील प्रमाणे कार्योत्तर मंजूरीसह दि.३०/०५/२०१६ अखेर पर्यत सहा ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणे करीता मा.स्थायी समितीची मंजुरी घेवुन कार्योत्तर मंजुरी व पुढील कालावधी करीता कार्यारंभ आदेश देणेकरीता मंजुरीस्तव आदेशार्थ व येणा-या खर्चास मंजुरीस्तव सविनय सादर.

सोबत- प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांचे अहवाल

लेखा शिर्षक- सन २०१६-१७ प्रस्तावीत बजेट पान नं.०४/०३

खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे

१. तरतुद :- ८,००,००,०००/-

२. पुर्वीचा खर्च :- ९,२५,३८०/-

३. प्रस्तावीत खर्च :- ४७,८२,९६०/-

२ व ३ ची बेरीज :- ५७,०८,३४०/-

४. शिल्लक :- ७,४२,९१,६६०/-

येणेप्रमाणे मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा फेरअहवाल असे.

--३--

यावर विभाग प्रमुख घन कचरा व्यवस्थापन यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय कि,पुर्व लेखापरिक्षण करण्यात आले लेखा परिक्षण तृटी निरंक

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार व नमूद करणांमुळे झालेला विलंब व नमूद "क्ष" प्रमाणेची कार्योत्तर मान्यतेची कार्यवाही मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने करण्यात हरकत नाही. मे. स्थायी समिती विषय सादर करणेबाबत हरकत नाही मे. आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त फेरसादर अहवाल प्रमाणे व मुदतीबाबत करारनाम्या मधील अटी व शर्ती अन्वये अट क्र.१४ नुसार मुदतवाढ प्राप्त परिस्थिती नुसार व अत्यावश्यक सेवा खंडित होउ नये म्हणून दिलेली आहे. तरी मान्यतेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे करिता प्रस्तावीत करणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता म.न.पा. हद्दीतील घनकच-याचे व जादा लोकसंख्याच्या ठिकाणी जमा होणा-या कचरा कुंडीवरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणेकरीता मंजूर निविदाकार यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिलीप सातपुते : कचरा संकलन टेंडर चे काशात अडकले आहे ते सांगा

मा.उपायुक्त श्री.बेहरे :- या बाबतची एक निविदा आहे.फेरनिविदा मागवावी लागेल.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- निविदेमध्ये दोन -तीन कागदपत्रे कमी आहे.त्यामुळे आपण ते टेक्नीकली फायनल म्हणू शकत नाही.

मा.श्री.मुद्दतसर शेख :- आपण टेंडर तीन वेळेस रिकॉल करतो.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- संपूर्ण शहरासाठी चार ठेकेदार असावे असे मा.महापौर साहेब यांनी सांगीतले आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- तुम्ही त्या ठेकेदाराला कागदपत्र कमी आहे म्हणून पत्र दिले आहे का?

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- चार झोनसाठी निविदा काढल्या होत्या.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आवश्यक कागदपत्रे मागवून त्याची पुर्तता करून टाका.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- तीन पेपर्स कमी आहेत.दोन महिन्यापुर्वी तेच ठेकेदार यांनी निविदा भरली होती. तेच कागद कमी आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- एक कॉम्पॅक्टर १० कुंडयांमधील कचरा भरतो.

मा.श्री.दिलीप सातपुते :- बाहेरचे किती वहाने आपण घेतली आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- बाहेरचे १२ ट्रॅक्टर चालू आहेत.त्यांना इंधन व ड्रायव्हर सह २४०० रू प्रती भाडे आहे.व ४ डंपर आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- शहरामध्ये ३५० कचराकुंडया आहेत.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- निविदा प्रक्रियेमध्ये अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रे मागवावी लागतील तसे त्यांना पत्र देवू.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेतील या विषयाबाबत ची माहिती सांगा

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- हा विषय कार्योत्तर मंजूरीसाठी आला आहे. चार ट्रॅक्टर्सची दिनांक २२/०७/२०१५ पासुन दिनांक ३०/०५/२०१६ अखेर पर्यत असे एकुण १२५६ कामाचे दिवस व दोन ट्रॅक्टर्सची दिनांक १५/०७/२०१५ पासुन दिनांक ३०/५/२०१६ अखेर पर्यत ६४२ कामाचे दिवस मुदतवाढ देणे क्रमप्राप्त आहे. मंजुर ई - निविदा दर प्रति ट्रॅक्टर प्रति दिवस रक्कम रू.२५२०/-(ड्रायव्हर इंधनसह) याप्रमाणे एकुण सहा ट्रॅक्टर एकुण १८९८ कामाचे दिवस उलपब्ध करून घेतल्यास अंदाजे एकुण खर्च रक्कम रूपये ४७,८२,९६०/- (सत्तेचाळीस लाख ब्याअंशी हजार नउशे साठ रूपये) बीलाच्या मंजूरीसाठी आहे.

मा.सभापती साहेब :- पुढील कालावधी साठी काय?

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- १० ते १२ ट्रॅक्टर्स सध्या सण असल्यामुळे कंन्टीन्यू चालू ठेवावी लागणार आहे.

मा.सभापती साहेब :- दुस-या संस्थेने काम करण्यास इच्छूक असलेबाबत सांगीतले आहे का?

मा.श्री. गणेश भोसले :- पहिल्या ठेकेदाराच्या काही तक्रारी आल्या आहे का?

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- स्थायी समितीच्या कक्षेतील विषय असल्यामुळे विषय आला.

मा.श्री.गणेश भोसले :- हा अत्यंत चांगलं काम आहे. म्हणून तर पेपरमध्ये रोज असे कचरासाठल्याचे फोटो येताता.

मा.सौ.छाया तिवारी :- या ठेकेदाराची मुदत संपल्यानंतर दुसरा ठेकेदार नेमावा.

मा.सभापती साहेब :- या विषयास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

मेकॅनिकल इंजी.श्री. निकम :- सीना नदी पात्रात शहरातील सांडपाणी व मैलापाणी सोडल्यामुळे जिल्हा परिषद हद्दीतील सीना नदी प्रवाहाच्या लगतच्या गावांचा पाणीपुरवठा दुषीत होते.या कारणाने जिल्हा परिषद अहमदनगर यांनी महानगरपालिकेच्या विरूध्द मा.राष्ट्रीय हरित लवाद यांच्या कडे दावा दाखल करण्यात आला आहे.या बाबतचा प्रस्ताव मी आजच सभेपुढे सादर करीत आहे.

मा.दिलीप सातपुते :- एवढी काय तातडीचा प्रस्ताव आहे का?

मा.बाळासाहेब बोराटे :- आजच लगेच अजेंडा काढा या विषया करीता ?

मेकॅनिकल इंजी.श्री. निकम :- अजेंडा काढायचा असेल तर कमीत कमी तीन ते चार दिवसचा कालावधी लागेल.आपल्याला दि.६/९/१६ रोजी हरीत लवादाकडे सिना नदी प्रदुषण प्रतिबंध करणेसाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजने बाबत ची माहिती दयावयाची आहे.हा विषय पुन्हा स्थायी समितीमध्ये येणारच आहे.

मा.सभापती साहेब :- ठिक आहे. सिना नदी प्रदुषण प्रतिबंध करणेसाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजने कामी तांत्रिक एजन्सीकडून मागविण्यात आलेल्या स्वारस्य अभिरूची चे कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

मा.श्री.अनिल बोरूडे :- घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता कचरा कुंडीवरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणेकरीता मंजूर निविदाकार यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेबाबत च्या ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या प्रमाणे कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.व प्रशासनाने सभेमध्ये सादर

केल्या नुसार सिना नदी प्रदुषण प्रतिबंध करणेसाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजने कामी तांत्रिक एजन्सीकडून मागविण्यात आलेल्या स्वारस्य अभिरूची चे कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी.

मा.श्री.मनोज दुलम :- सभागृता झालेल्या चर्चे नुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कचरा संकलन करणारे ठेकेदार एजन्सीला कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.व प्रशासनाने तातडीने सभेमध्ये सादर केलेल्या प्रस्तावानुसार सिना नदी प्रदुषण प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजनेच्या कामास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता म.न.पा. हद्दीतील घनकच-याचे व जादा लोकसंख्याच्या ठिकाणी जमा होणा-या कचरा कुंडीवरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणेकरीता मंजूर निविदाकार यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेबाबत च्या ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या प्रमाणे फक्त कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे. प्रशासनाने सभेमध्ये सादर केल्या नुसार सिना नदी प्रदुषण प्रतिबंध करणेसाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजने कामी तांत्रिक एजन्सीकडून मागविण्यात आलेल्या स्वारस्य अभिरूची चे कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागा करीता म.न.पा. हद्दीतील घनकच-याचे व जादा लोकसंख्याच्या ठिकाणी जमा होणा-या कचरा कुंडीवरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणेकरीता मंजूर निविदाकार यांच्याकडून ट्रॅक्टर ट्रॉलीसह उपलब्ध करून घेणेबाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या प्रमाणे फक्त कार्योत्तर मंजूरीस हि सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने आजच सभेमध्ये सादर केल्या नुसार सीना पात्रात सोडण्यात येणारे सांडपाणी व मैलापाणी यामुळे सीना नदी पात्रातील पाणी दुषित होवून त्यामुळे जिल्हा परिषद हद्दीतील सीना नदीच्या प्रवाहाच्या भागातील लगतच्या गावांना दुषित पाणी पुरवठा होतो,या करणाने जिल्हा परिषद अहमदनगर यांनी महानगरपालिके विरूध्द मा.राष्ट्रीय हरित लवाद (N G T) यांचेकडे दावा दाखल करण्यात आलेला आहे.मा.हरित लवादाचे आदेशानुसार सिना नदी प्रदुषित न होणे बाबत ठोस कार्यवाहीच्या दृष्टीने अहमदनगर महानगरपालिकेकडून सिना नदी प्रदुषण प्रतिबंध करणेसाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजने कामी तांत्रिक एजन्सीकडून मागविण्यात आलेल्या स्वरस्य अभिरूची (E.O.I.) चे कामास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. .ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.अनिल बोरूडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ८१ शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. मोहन वसंत शेळके, यांनी मिस्कीन मळा येथील गंगाउदयान बाहेरील बांधलेल्या गाळयालगतची मोकळी जागा १०X२०चौ. फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

**संदर्भ :-** श्री. मोहन वसंत शेळके यांचा दि.४/५/२०१६ रोजीचा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, मिस्कीन मळा येथील गंगा उदयानच्या बाहेरील बांधलेल्या गाळयालगतची मोकळी जागा व्यवसायासाठी भाडे तत्वावर मिळणेबाबत. श्री. मोहन वसंत शेळके यांचा दि.४/५/२०१६ रोजीचा अर्ज देउन १०x२०चौ.फुटाची मोकळी जागा मिळणेस विनंती केली आहे.

याबाबत मा.नगररचनाकार यांनी जा.क्र.४८६८ दि.२९/६/२०१६ अन्वये जागेचे क्षेत्र २००.०० चौ.फुट म्हणजेच १८.५९ चौ.मी.करिता दरमहा भाडे रू.४०००/- तसेच अनामत रक्कम रू.४८०००/- इतकी घेणे योग्य होईल तसेच सदर जागेत कोणत्याही प्रकारचे कच्चे अथवा पक्के बांधकाम करता येणार नाही. असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविणे उचित वाटते.सबब आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार कार्यवाही करणे असे मत आहे. "अ" नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" नुसार प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--***--

**<u>चर्चा</u> :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. मोहन वसंत शेळके, यांनी मिस्कीन मळा येथील गंगाउदयान बाहेरील बांधलेल्या गाळयालगतची मोकळी जागा १०X२० चौ.फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत विषय आहे.

मा.श्री. मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- गंगाउदयान जवळ म्हणजे कोठे जागा दयायची आहे?

मार्केट विभाग प्रमुख श्री तांबोळी :- गंगाउदयान च्या बाहेर महानगरपालिकेने गाळे बांधलेले आहेत.त्या गाळयांलगत जागेची मागणी केली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- किती बाय किती जागेची मागणी केली आहे ? त्याचे भाडे व अनामत रक्कम किती आकारली आहे ?

नगररचनाकार श्री.पाटील :- जागेचे क्षेत्र २००.०० चौ.फुट म्हणजेच १८.५९ चौ.मी.करिता दरमहा भाडे रू.४०००/- तसेच अनामत रक्कम रू.४८०००/- इतकी घेणे योग्य होईल.

मा.श्री.मुदस्सर शेख :- या जागेवर पक्के बांधकाम करता येते का ?

नगररचनाकार श्री.पाटील :- सदर च्या जागेत कोणत्याही प्रकारचे कच्चे अथवा पक्के बांधकाम करता येणार नाही. असे माझे मत आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- जर या जागेवर कच्चे व पक्के बांधकाम करता येणार नसेत तर या मोकळया जागेवर काय व्यावसाय करणार.

मा.उपायुक्त श्री बेहेरे :- अर्जदार श्री मोहन शेळके यांचा गंगाउदयान जवळ गाळा क्र.९ असुन या गाळया लगत मोकळ्या जागेमध्ये टेबल,खुर्च्या टाकता येतील.

मा.सभापती साहेब :- माझ्या कडे श्री.अभिजीत सुभाष म्हस्के रा.मंगलगेट यांचा अर्ज प्राप्त झालेला आहे त्यांनी जुना दाणे डबरा येथील मंगलगेट चौकी समोर सरदार पटेल चौक येथे ६x१०चौ.फु. ची मोकळी जागा भाडे तत्वावर मिळणे बाबत मागणी केली आहे.तसेच अर्जदार श्री किरण चंद्रशेखर कुलकर्णी रा.नालेगांव यांनी गाडगीळ पटांगण,पावन हनुमान चौक,मुतारी शेजारी पुर्व बाजुस १०x१० चौ.फुट मोकळी जागा भाडे तत्वावर मिळणे बाबत मागणी केली आहे.

मा.सौ.छाया तिवारी :- श्री.कुलकर्णी यांचा अर्ज किती तारखेला प्राप्त झाला आहे.

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- दि.२८/८/१४ रोजी अर्ज प्राप्त झालाअसुन त्यावर प्रस्ताव सादर करून नगररचना विभागा कडे पाठविण्यात आला.

नगररचनाकार श्री.पाटील :- भाडे व अनामत निश्चित करून सदरचा प्रस्ताव दि.१८/९/२०१४ रोजी मार्केट विभागाकडे पाठविण्यात आला.

मा.सौ.छाया तिवारी :- या जागेस किती भाडे व अनामत रक्कम किती आहे.

नगररचनाकार श्री.पाटील :- सदर जागेस अनामत रक्कम २४ हजार व मासिक भाडे ५००/- घेणे योग्य होईल असे सन २०१४ च्या रेडीरेकनर च्या दरानुसार निश्चित केले होते.सन २०१६ च्या रेडीरेकनर च्या दरानुसार पुन्हा भाडे व अनामत रक्कम निश्चित करावे लागेल.

मा.सौ.छाया तिवारी :- सन २०१६ च्या रेडीरेकनर च्या दरानुसार पुन्हा भाडे व अनामत रक्कम निश्चित करून श्री.कुलकर्णी व श्री.म्हस्के यांना भाडेतत्वार जागा देण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- श्री.कुलकर्णी व श्री.म्हस्के यांना भाडेतत्वार जागा देण्याची नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री. मोहन वसंत शेळके, यांनी मिस्कीन मळा येथील गंगाउदयान बाहेरील बांधलेल्या गाळयालगतची मोकळी जागा १०X२० चौ.फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.व श्री.अभिजीत सुभाष म्हस्के रा.मंगलगेट यांचा प्राप्त अर्जानुसार त्यांना जागा भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही करण्यात यावी. श्री.किरण चंद्रशेखर कुलकर्णी यांचा अर्ज सन २०१४ मध्येच मार्केट विभागा प्रलंबित असून त्यांच्या मागणी नुसार १०x१० चौ.फुट जागा सन २०१६ च्या रेडीरेकनर च्या दरानुसार पुन्हा भाडे व अनामत रक्कम निश्चित करून भाडेतत्वार देण्यात यावी.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री. मोहन वसंत शेळके, यांनी मिस्कीन मळा येथील गंगाउदयान बाहेरील बांधलेल्या गाळयालगतची मोकळी जागा १०X२० चौ.फुट इतक्या जागा व्यावसायासाठी जागाभाडे पोटी भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेवून देणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.व सभेमध्ये प्राप्त झालेल्या अर्ज व झालेल्या चर्चे नुसार श्री.अभिजीत सुभाष म्हस्के रा.मंगलगेट

यांना ६x१० चौ.फुट जागा व श्री.किरण चंद्रशेखर कुलकर्णी यांचा अर्ज मागणी नुसार १०x१० चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता देण्यात यावी व सन २०१६ च्या रेडीरेकनर च्या दरानुसार नियमाप्रमाणे भाडे व अनामत रक्कम आकारण्यात यावी.या जागा देण्याच्या सर्व अर्जाबाबत संबंधीत विभागांनी आवश्यक कार्यालयीन कार्यवाही पुर्ण करावी. वरिल सर्व अर्जदारांना जागा ११ वर्ष मुदतीने देण्यात याव्यात.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.छाया तिवारी सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ८२ शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** पर्यटनासाठी पायाभुत सुविधा सन २०१५-२०१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१४०२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.२१३/२,२०६/१ ब,/१अ/१ब/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदा मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय : पर्यटनासाठी पायाभूत सुविधा सन २०१५-२०१६ अंतर्गत ई- निविदा क्र.१४०२अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.२१३/२,२०६/१ब,/१अ/१ब/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदा मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता : जा.क्र. नियोजन-२०१५/जिवायो/संस-३/७२९/२०१६ दि.५/३/२०१६ अन्वये मंजुरी

२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन २०१५-२०१६

३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १४०२ सन २०१६-२०१७

४] निविदा विक्री कालावधी :- दि.२१/६/२०१६ ते ६/७/२०१६

५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.८/७/२०१६ ते ११/०७/२०१६

६] निविदा उघडण्याची तारीख :- दि..०३/०६/२०१६

७] कामाची मुदत :- प्रत्येकी ६ महिने.

८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| अ. क्र | ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदा धारकाने भरलेला दर | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांनी भरलेला दर. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | सा.बां.वि./ ई-निविदा क्र.१४०२ २०१५-१६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.२१३/ २, २०६/१ब,/१अ/१ब ा/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे | २७,९५,९९३ /- | मे. अनिल झेड कोठारी अहमदनगर | ५.५०% जादा | श्री. रोहन एस मांडे ०.९९% कमी दराने |
| | | | | श्री. राजेंद्र लोणकर अहमदनगर | ५.००% जादा | |
| | | | | श्री. रोहन एस मांडे, अहमदनगर | ०.९९ % कमी | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.७ मध्ये नमुद ठेकेदार श्री. रोहन एस मांडे , अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे ०.९९% कमी असल्याने सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव तथा मंजूरीस्तव पाठविणेस सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, उपरोक्त तीन प्राप्त निविदांमध्ये श्री. रोहन एस मांडे यांची निविदा सर्वात कमी ०.९९% निविदा दरापेक्षा कमी दराची असलेने मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय कि,पुर्व लेखापरिक्षण करण्यात आले लेखा परिक्षण तृटी निरंक

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार व नमूद "अ" प्रमाणे प्राप्त निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीचे प्राप्त झालेने मे.स्थायी समिती सभेत सादर करणेस हरकत नाही मे. आदेशार्थ सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा "मान्य" करणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणेकामी निर्णयाकरिता "अ" प्रमाणे सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदा मंजुरी बाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आयुर्वेद परिचय केंद्र म्हणजे काय?

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- धर्माधिकारी मळयातील जागा ही आयुर्वेदची माहिती लोकांना मिळावी यासाठी एक हॉल व टॉयलेट चे बांधकाम करणे कामी ची निविदा आहे.

मा.सभापती साहेब :- मनपा हद्दीमध्ये शेतजमीनीच्या / भुखंडांच्या व्यावहारांच्या नोंदी महानगरपालिकेस दप्तरी घेतल्यास १ % हस्तांतरण शुल्क महानगरपालिकेस मिळेल.सदयस्थितीत शेतजमिनीच्या नोंदी घेतल्या जात नाहीत.

मा.श्री.श्रीकांत छिंदम :- येणे प्लॉटला कर आकारणी कराता येईल.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- शेतजमीनीला महानगरपालिके मध्ये नोंद घेता येत नाही.एल.बी.टी.लागू करतांना ४ % ऐवजी ५% केला.

मा.सभापती साहेब :- शेतजमीनीच्या नोंदी घेणे बाबत माहिती घेवून १% हस्तांतरण फि लावण्या बाबत याची माहिती घेवून कार्यावाही करता येते का पहा. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. वाडिया पार्क मधील दुकान,गाळे यांच्यावर आपण कर आकारणी करतो का?

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- जे गाळे चालू आहे त्यावर आपण कर आकारणी केली आहे.जो पुर्वीचा मंजूर प्लॉन आहे त्याला कर आकारणी केली आहे.दोन कॉम्प्लेक्स मधील गाळे बंद आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- प्लॅन नुसार किती गाळे मंजूर आहेत.

प्रभाग अधिकारी श्री.गोसावी :- १४१ गाळयांना कर आकारणी केली आहे.१ कोटी १० लाख थकीत आहे.६० ते ७० गाळयांना कर आकारणी नसेल.

मा.श्री.गणेश भोसले :- मुथ्थांच्या गाळयांना कर आकारणी आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- मंजूर प्लॅन नुसार सिंगल दाराने कर आकारणी केली आहे.२६७ अ नुसार कर आकारणी करून टाका.

मा.सभापती साहेब :- या गाळयांना कंम्लीशन आहे का?

मा.श्री.गणेश भोसले :- बाकीच्या गाळयांना जेव्हा पासून कर आकारणी केली तेव्हा पासूनच यांनाही कर आकारणी करावी लागेल.

मा.सभापती साहेब :- बुधवारच्या मिटींगच्या आधी सगळयांना माहिती दया.म्हणजे बुधवारी चर्चा करता येईल.

मा.नगररचनाकार श्री.पाटील :- हायकोर्टाच्या ऑर्डरनुसार गाळे सिल केले आहे.

मा.सभापती साहेबः-या गाळयांना कर आकारणी केली का? १०ते १५वर्षापासुन पट्टी आकारावी ते पट्टी भरतात का? जर घरपट्टी भरली नसेल तर त्यांना नोटीसा दया.तरीही पैसे नाही भरले तर सील करून टाका.

प्रभाग अधिकारी श्री गोसावीः- वॉरंट काढल्यानंतर पदाधिका-यांचे फोन येतात.

मा.सभापती साहेब :-वॉरंट घेवून गेल्यानंतर कुणाचा फोन येतो.टेक्नीकाल बाब असलीतरी नोटीसा काढा.कारण आपल्याला पगाराला सुध्दा पैसे नाहीत.

मा.बाळासाहेब बोराटे :- घरपट्टीचे सर्व्हेक्षण चालू आहे.यावर कोणत्या विभागाचे नियंत्रण आहे.साहेब हे मोजमापे घेणारे लोक पैसे मागतात.

मा.सभापती साहेब :- रिव्हीजन किती वर्षानी केले पाहीजे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- दर ५ वर्षानी रिव्हिजन घेतले पाहिजे.

मा.सभापती साहेब :- जुन्या घराची घरपट्टी थकीत आहे.जुने घर पाडून नविन बांधकाम झाले.रिव्हीजन साठी आदेश देण्यात यावेत जेणे करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.प्रत्येक अधिका-यांना वाहन आहे.नगररचनाकार यांना महानगरपालिकेने वाहन उपलब्ध करून दिले पाहिजे.त्यांना फिल्डवर्क आहे.नविन कोणती गाडी येणार आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- नविन गाडी येणार नाही.

मा.सभापती साहेब :- उन,वारा,पाउस असतो.त्यामुळे त्यांना बाहेर जाता येत नाही.ज्यांना फिल्ड वर्क नसतांना सुध्दा महानगरपालिकेचे वाहन आहे असे किती अधिकारी आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ज्या अधिका-यांना फिरायचे काम असेल अशा अधिका-यांनाच गाडी दया.ज्यांना फिल्डवर्क नाही त्यांना गाडीची आवश्यकता नाही.

मा.सभापती साहेब :- या बाबत तुम्ही माहिती घवून प्रस्ताव पाठवा.त्यानंतर निर्णय घेवू.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- घरपट्टी आकारणी बाबत क्रॉस चेक करणे आवश्यक आहे.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- एजन्सीने काम केल्यावर वसुली लिपीकाने तपासणी करणे आवश्यक आहे.कर निरीक्षक,प्रभाग अधिकारी यांचीही जबाबदारी आहे.या बाबत संबंधीत एजन्सीला नोटीस काढू.

मा.सभापती साहेब :- मागच्या वेळेलाच ठरले होत मनपाच्या विदयुत विभागाकरीता दोन हायड्रॅालिक गाडी घ्यायची. याबाबत काम झाले.

मा.उपायुक्त श्री. बेहरे :- त्या फाईलवर अति. आयुक्तांनी शेरा मारला आहे.

मा.श्री. गणेश भोसले :- सभापती तुमचा कालावधी संपेल. तरी गाडी येणार नाही.

मा.सभापती साहेब :- गाडी घेण्यात यावी असा शेरा सगळयांनी दिला.मग सहया का होत नाही अतिरिक्त आयुक्त का सहया करत नाही.अतिरिक्त आयुक्तांना सभेत बोलवा. जर एखादा आयुक्त चुकीचे शेरा मारत असतील तर त्याच्यावर कार्यवाही करून आम्ही निलंबित करू शकतो.

विदयुत प्रमुख श्री. सातपुते :- फेरसादर अहवालाप्रमाणे घसारा निधीमध्ये शिल्लक तरतदीनुसार बजेटमध्ये तरतुद करावी लागते.

मा.श्री.गणेश भोसले :- बजेटपर्यत तुम्हाला थांबाव लागेल.

मा.सभापती साहेब :- अति.आयुक्त श्री. वालगुडे साहेब येथे आलेले आहेत. त्यांची सही घेउन आयुक्तांची खाली जाउन सही घेउन विषय संपवता येईल.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- तरतुद आहे ती घसारा निधी अंतर्गत प्रस्तावीत घसारा निधीमधील शिल्लक निधीमधून बजेटमधील तरतुदी नुसार कार्यवाही करावी. माझी कुठेही निगेटीव्हीटी नाही.

मा.सभापती साहेब :- विदयुत विभागासाठी गाडी लावली त्याला किती खर्च येतो संबंधीत विभागाच्या बजेट प्रोव्हीजननुसार खरेदी करता येईल.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- घसारा निधी म्हणजे वाहन खरेदी पैकी विदयुत विभागाकडे प्रोव्हीजन करावी लागेल.

मा.सभापती साहेब :- घसारा निधी म्हणजे काय

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- खर्चाला त्या विभागामध्ये प्रोव्हीजन पाहिजे.

मा.श्री.गणेश भोसले :- कॅफो साहेब , ऑडीटर हे तुम्हाला गोल गोल फिरवतात.

मा.सभापती साहेब :- एखादया हेडवर तरतुद असली तर

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- विदयुत विभागाने रिपोर्ट ठेवला पाहिजे

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑडीट पॉईंट निघू शकतो का

मुख्यलेखापरिक्षक श्री. अनारसे :- प्रस्ताव योग्य आहे.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- अंदाजपत्रकीय तरतुद करायची असे म्हटल हि नकारार्थी बाब नाही.

मा.श्री. दिलीप सातपुते :- इथे तुमच्या शे-याची गरज आहे का ? हाच महत्वाचा प्रश्न आहे.

मा.सभापती साहेब :- योग्य तो शेरा मारा आम्ही आयुक्तांनी सही घेतो गाडी कधी खरेदी करायची ते सांगा.

मा.अति.आयुक्त श्री. वालगुडे :- माझा शेरा नकारार्थी नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- जाउ दया गाडी भाडयानेच लावून टाका.

मा.सभापती साहेब :- काय शेरे मारायचे ते मारा एकदाच आजच तो विषय फायनल करायचा आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- चला सभापती व सर्व सदस्य आयुक्त साहेब यांच्या दालनात जावुन स्वाक्षरी घेवू.

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- सगळयाची जावयाची गरज नाही इंजि. सातपुते तुम्ही आणी स्वाक्षरी घेवुन या

विदयुत प्रमुख श्री. सातपुते :- स्वाक्षरी घेवुन आलो.

मा.सभापती साहेब :- आयुक्त साहेबांनी काय शेरा मारला.

विदयुत प्रमुख श्री. सातपुते :- वर्क ऑर्डर लगतच्या सर्वसाधारण जनरल बोर्ड मध्ये रिअपरोसिएट करून ठराव मान्यता मिळाल्यानंतर देणे उचित होईल. असा शेरा मारला.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता मोटर व्हेईकल विभागामार्फत ई-निविदा राबवून २ नग हायड्रोलिक गाडी खरेदीस व खर्चास मंजूरी देण्यात आहे. व महानगरपालिकेच्या घसारा निधी मधून खर्च करण्यात यावा. घसारा निधी अंतर्गत उक्त खर्च करणेस सन २०१६-२०१७ चे पुर्नलोकनाच्या अंदाजपत्रकीय अदिन राहून करण्यात यावा. तसेच सदर बाब पुर्नलोकनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदी मध्ये प्राधान्याने घेण्यात यावी. याबाबत ही सभा मा. महासभेस शिफारशीसह विनंती करण्यात येत आहे.

मा.श्री.मनोज दुलम :- आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदा कामास मंजूरी देण्यात यावी. व अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता मोटर व्हेईकल विभागामार्फत ई- निविदा राबवून २ नग हायड्रोलिक गाडी खरेदीस व खर्चास मंजूरी देण्यात आहे.

मा.सौ.छाया तिवारी :- आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदा मंजुरी देण्यात यावी. व महानगरपालिकेचे अधिकारी यांना वाहन उपलब्ध अथवा वाहन परिपुर्ती दिली जाते. याबाबत ज्या अधिका-याना आउटडोअर कामे करावीच लागतात त्यांनाच वाहने उपलब्ध करून दयावीत. इतराची वाहने बंद करण्यात यावी.

मा.सभापती साहेबः-सावेडी सर्व्हे नं.२१३/२,२०६/१ ब,/१अ/१ब/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामांच्या निविदाऑफिस रिपोर्ट नुसार मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता मोटर व्हेईकल विभागामार्फत ई- निविदा राबवून २ नग हायड्रोलिक गाडी खरेदीस व खर्चास मंजूरी देण्यात आहे. व महानगरपालिकेच्या घसारा निधी मधून खर्च करण्यात यावा. घसारा निधी अंतर्गत उक्त खर्च करणेस सन २०१६-२०१७ चे पुर्नलोकनाच्या अंदाजपत्रकीय अदिन राहून करण्यात यावा. तसेच सदर बाब पुर्नलोकनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदी मध्ये प्राधान्याने घेण्यात यावी. याबाबत ही सभा मा. महासभेस शिफारशीसह विनंती करण्यात येत आहे.

**ठराव :-** पर्यटनासाठी पायाभुत सुविधा सन २०१५-२०१६ अंतर्गत ई - निविदा क्र.१४०२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सावेडी सर्व्हे नं.२१३/२,२०६/१ ब,/१अ/१ब/२/१ या ओपन स्पेसमध्ये आयुर्वेद परिचय केंद्र बांधणे या कामाची निविदेस ही सभा मान्यता देत आहे.

प्रशासनाने आजच सभेमध्ये सादर केल्या नुसार "अहमदनगर महानगरपालिका विदयुत विभागाकरिता मोटर व्हेईकल विभागामार्फत ई- निविदा राबवून २ (दोन) नग हायड्रोलिक गाडी खरेदी खर्च रूपये २८,३६,०००/- (अक्षरी रूपये अठ्ठावीस लाख छत्तीस हजार फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यात आहे". महानगरपालिकेच्या घसारा निधी मधून खर्च करण्यात यावा. घसारा निधी अंतर्गत उक्त खर्च करणेस सन २०१६-२०१७ चे पुर्नविलोकनाच्या अंदाजपत्रकास अधीन राहून करण्यात यावा. तसेच सदर बाब पुर्नविलोकनाच्या अंदाजपत्रकीय तरतुदी मध्ये प्राधान्याने घेण्यात यावी. याबाबत ही सभा मा. महासभेस शिफारशीसह विनंती करण्यात येत आहे. प्रशासनाने तात्काळ खरेदी साठीच्या प्रक्रिया राबवावी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ८३ शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे बाबतच्या कामांची फेर निविदा क्र.३ ई -निविदा क्र.१४१९ या निविदेच्या दराच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

विषय- विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे बाबतच्या कामांची फेर निविदा क्र.३ ई-निविदा क्र.१४१९ या निविदेच्या दराच्या मंजुरीबाबत.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त यांची दि.२३/०३/२०१६

२] तांत्रिक मान्यतेची दरसुची :- सन २०१३-१४

३] ऑनलाईन ई- निविदा क्र. १४१९/सन २०१६-२०१७ (फेर निविदा क्र.३)

४] निविदा विक्री कालावधी :- दि.२६/०७/२०१६ ते दि.३०/०७/२०१६

५] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. ०१/०८/२०१६ ते ०४/०८/२०१६

६] निविदा उघडण्याची तारीख :- दि..१०/०८/२०१६

७] कामाची मुदत :- प्रत्येकी १२ महिने.

८] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :-

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | सर्वात कमी दराचे निविदा धारक व त्यांनी भरलेला दर. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १४१९ | रस्ते देखभाल दुरूस्ती व पॅचींग | ७०,००,०००/- | श्री. ए.जी. वाबळे | १६.०० % जादा दराने |

उपरोक्त कामांची यापुर्वी ३ वेळा मुदतवाढ देवुन पुन्हा फेर निविदा क्र.३ ई -निविदा क्र.१४१९ /सन २०१५-१६ ऑनलाईन पध्दतीने B-१ निविदा मागविणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेच्या http:// amc.maharashtra.etenders.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली होती. निविदेच्या कालावधीनुसार आवश्यकतेप्रमाणे २ निविदा प्राप्त असल्यामुळे सदर निविदाचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात येवुन कागदपत्रांची छाननी करता प्राप्त २ निविदा धारकपैकी ठेकेदार श्री. इम्रान जहागिर शेख यांची निविदा अटी शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता होत नसल्याने त्यांची निविदा अस्विकृत करून उर्वरित एकमात्र ठेकेदार यांच्या निविदेच्या दराचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला असुन वरील तक्त्याच्या अनुषंगाने रकाना क्र.५ मध्ये नमुद ठेकेदार श्री. ए.जी. वाबळे , अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मक दृष्टया कमी दराची म्हणजे निविदा दरापेक्षा १६.०० % जादा दराने असुन ती अवाजवी वाटत असल्याने संबंधित ठेकेदार श्री.ए.जी. वाबळे , अहमदनगर यांना निविदा दराच्या वाटाघाटीसाठी मा.छाननी समितीसमोर दि.१६/०८/२०१६ रोजी समक्ष बोलविले असता यशस्वी ठेकेदार श्री.ए.जी.वाबळे, अहमदनगर यांनी दि.१६/०८/२०१६रोजी पत्र देवून १६.००% जादा दराबाबतचा खुलासा दिलेला आहे तो खालील प्रमाणे..

१] सदरचे काम हे खड्डे बुजविणेचे असल्याने प्रत्येक खडडयाचे सफाई करणे, खडडे भरणे, रोलींग करणे, डांबर गरम करून खडीवर डांबर मारणे, पुन्हा त्यावर क्रशमेटल टाकणे, पुन्हा रोलर फिरविणे इ. प्रकारे ग्राउडींग पध्दतीने खडडे भरल्यानंतर , त्यावर पुन्हा २-४ दिवस ट्रॅफिक सोडून पुन्हा त्या खड्डयावर सफाई करून हॉटमिक्स मटेरियल टाकणे पुर्वी सफाई करणे, गरम डांबर मारणे, हॉटमिक्स मटेरियलने एकसारखा समान

पातळीत माल पसरविणे, पुन्हा रोलींग करणे, वाहतुक त्वरीत सोडावी लागणार काम थंड होईपर्यंत त्यावर टॅककोट मारणे रोलींग करणे इतके काम वाहतुक सुरू असतांना , ट्रॅफीक कंट्रोल करून काम करावे लागते. एका खड्डयाचे काम पुर्ण झाल्याशिवाय पुढे आता येत नाही. प्रत्येक खड्डयातील पाणी, चिखल माती, मुरूम काढून वरीलप्रमाणे सर्व प्रोसेस करावी लागते. प्रत्येक खड्डा खडीचा साठी अंदाजे करावा लागत असल्याने मटेरियल वेस्टेज होण्याची शक्यता असते. दिवसभरात जे काम रेग्युलर पध्दतीने ज्या गतीने व ज्या प्रमाणात होते. त्यापध्दतीने खड्डे भरणे काम त्याच व्यवस्थापनाखाली १०% पेक्षा होउ शकत नाही.

२] काम करणेस प्रचंड वेळ लागतो, त्याचप्रमाणात खर्चाचा विचार केल्यास काम करणे परवडणारे नसते.

३] निविदेत भरलेल्या मंजुर दरातच काम करावे लागते. कामाचे मुदतीपर्यंत काम करावे लागणार आहे. मात्र मटेरियलचे दरावर कोणतेही वाढीवर नियंत्रण नसल्याने नुकसान होण्याचा संभव आहे.

४] अशा प्रकारे या सर्व बाबींचा विचार करून माझ्या अनुभवावरून अतिशय वाजवी व रास्त दर नमुद केलेले असुन आपणही केलेल्या कामाचे मोजमाप करून दरमहा मला होणा-या कामाचे मोल देण्यास तयार असल्यास मी माझे दर निविदेतील भरलेले दरात सूट देणेस तयार आहे. केलेल्या कामाचे बीलाची रक्कम ५ तारखेच्या आत दिल्यास मी माझे दर ६.७० % ने कमी करून (सुट देणेस) तयार आहे. दरमहा होणारे कामाचे देयक ५ तारखेपर्यंत दिल्यास मी ९.७०% जादा दराने खडडे भरणेचे काम करणेस तयार आहे.

तरी वरील नमुद प्रमाणे ठेकेदार श्री.ए.जी. वाबळे , अहमदनगर यांनी अर्जात नमुद केलेल्या सद्यस्थितीचा विचार करता ठेकेदाराचा कामाबाबतच्या दराचा खुलासा योग्य वास्टतो. यशस्वी ठेकेदार यांनी सदरचे काम निविदा दरापेक्षा ९.७०% जादा दराने करणेस लेखी संमती दिली असुन केलेल्या कामाच्या देयकाची रक्कम ५ तारखेच्या आत देणेबाबत मागणी केली आहे. तरी निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करता येईल अशा निर्णयासह संबंधित ठेकेदार यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा ९.७०% जादा दराने करणेस मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार ठेकेदार श्री.ए.जी. वाबळे , अहमदनगर यांची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव तथा मंजुरीस्तव सविनय सादर/अ

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वार्षिक दर अंतिम करणेसाठी मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे करिता उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, कनिष्ठ अभियंता , शहर अभियंता व मा.छाननी समितीचे शिफारसीनुसार मा.स्थायी समितीच्या मंजुरीने कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत "अ"नुसारव छाननी समिती सभेच्या शिफारशी नुसार निविदा मंजुरीस्तव मे.स्थायी समिती सभेत सादर करणेस हरकत नाही तथापी मे.आदेशार्थ सादर.

यावर अति. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालाप्रमाणे प्रस्तावीत "अ" प्रमाणे चौथ्या वेळा आलेले दराप्रमाणे व छाननी समितीच्या शिफारशी नुसार निविदा दरापेक्षा ९.७० टक्के जादा दराने निविदा मंजुरीस्तव मा. स्थायी समितीकडे सादर करणेकामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे बाबतच्या कामांची फेर निविदा क्र.३ ई -निविदा क्र.१४१९ या निविदेच्या दराच्या मंजुरी विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. गणेश भोसले :- जादा दराने आहे का ? इस्टीमेट दराने दया एस्टीमेंन्ट दारापेक्षा जादा दराने देवू नका.

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- ४ वेळा निविदा मागवून कुणी आले नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ठेकेराची अट मान्य केली आहे का?

मा.सभापती साहेब :- नवीन काय स्कीम टाकली वाचा.

मा.शहर अभियंता श्री. सोनटक्के :- कामाच्या देयकाची रक्कम ५ तारखेच्या आत देणेबाबत मागणी केली आहे. तरी निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करता येईल अशा निर्णयासह संबंधित ठेकेदार यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा ९.७०% जादा दराने करणेस तयारी दर्शविली आहे.

मा.श्री. दिलीप सातपुते :- आम्ही मंजूर दिली आणि कुणी तक्रार केली किंवा न्यायालयात गेल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील.

मा.सभापती साहेब :- अटी नुसार बिल अदा करता येईल का ?

मा.शहर अभियंता श्री. सोनटक्के :- निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करता येईल.

मा.श्री.मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या प्रमाणे ठेकेदार श्री.वाबळे यांनी दिलेल्या पत्रा नुसार अट क्र.५ प्रमाणे त्याची अट मान्य करून ५ तारखेच्या आत झालेल्या कामाचे बिले अदा करावी. म्हणजे ६.७० टक्के सुट ठेकेदार देणार आहे. या करीता प्रशासनाने बिल अदा करणे बाबत आर्थिक नियोजन करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ.छाया तिवारी :- शहरातील खड्डयाची आवस्था पहाता व वर्तमान पत्रातुन होणारी टीका पहाता पुन्हा फेरनिविदा न काढता ठेकेदाराने टाकलेल्या अटी नुसार आर्थीक नियोजन करून केलेल्या कामाचे ५ तारखेच्या आत देयके देण्याची नियोजन करावे. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ठेकेदार श्री.ए.जी. वाबळे , अहमदनगर यांनी निविदा दरापेक्षा १६ टक्के जादा दराने निविदा दाखल केली परंतु त्यांनी पत्र देवून सदरचे काम निविदा दरापेक्षा ६.३० ने दर कमी करून ९.७०% जादा दराने करणेस लेखी संमती दिली आहे.परंतु त्यांनी केलेल्या कामाच्या देयकाची रक्कम ५ तारखेच्या आत देणेबाबत मागणी केली आहे. ठेकेदार यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा ९.७०% जादा दराने करणेस व त्यांनी मागणी केल्या नुसार केलेल्या कामाचे देयक दि.५ तारखे पर्यत अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार ठेकेदार श्री.ए.जी. वाबळे , अहमदनगर यांनी निविदा दरापेक्षा १६ टक्के जादा दराने निविदा दाखल केली. झालेल्या कामाचे देयकाची रक्कम ५ तारखेच्या आत देयके अदा केल्यास सदरचे काम निविदा दरापेक्षा ६.३० ने दर कमी करून ९.७०% जादा दराने करणेस लेखी अटी नुसार ठेकेदार यांना सदरचे काम निविदा दरापेक्षा ९.७०% जादा दराने करणेस मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार विविध देखभाल दुरूस्ती करीता वार्षिक ठेकेदार नेमणे या कामांची फेर निविदा क्र.३ ई -निविदा क्र.१४१९ या निविदेमधील नमुद दरास व त्यांनी मागणी केल्या नुसार केलेल्या कामाचे देयक दि.५ तारखे पर्यत अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही/-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ८४ शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ बाबत लाभार्यीचे सर्वेक्षण करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे साठी ई- निविदा १३९९ अन्वये मागविण्यांत आलेल्या ई- निविदेचा लिफाफा क्र.२ मधील दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीस्तव ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपलिका प्रकल्प विभाग

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, मा.प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ बाबत लाभार्थीचे सर्वेक्षण करणे, प्लॅन ऑफ ॲक्शन तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे त्या शासनाची मान्यता घेणे बाबत प्राप्त ई-निविदे मधील तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दर असलेले निविदाधारक **Stesalite Systems** या एजन्सीस दिनांक २६/०७/२०१६ रोजी छाननी समितीकडेस वाटाघाटी बोलविण्यात आले. सदर बाबत Stesalite Systems या एजन्सीने वाटाघाटी मध्ये प्लॅन ऑफ ॲक्शन बाबत नमूद केलेले दर रु. ६ लाख कमी करुन रु.४,९५,०००/- इतक्या दराने करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार छाननी समितीने खालील प्रमाणे शिफारस केली आहे.

सदर कामासाठी एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये निविदेत सर्वात कमी दर Stesalite Systems या एजन्सीने नमूद केले आहे. त्यानुसार सदर एजन्सीस दराचे वाटाघाटी बाबत बोलविले असता सदर एजन्सीने निविदेमध्ये चारही घटकांसाठी Plan of Action बाबत निविदे नमूद दर रु. ६ लक्ष च्या ऐवजी रु.४,९५,०००/- या दराने करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुसार Stesalite Systems या एजन्सीचे दर मंजुरी बाबत छाननी समितीने शिफारस केली आहे.

त्यानुसार Stesalite Systems या एजन्सीचे वाटाघाटी नंतर चारही घटकांसाठी खालील प्रमाणे दर आहेत.

| **Stage & Component** | **Stesalite Systems** |
|---|---|
| **Stage 1** | |
| **A)** Demand Survey of all Slum dwellers | Rs. 35/- |
| **B)** The rate for preparation of DPR % | 0.48% |
| **C)** Rate for Preparation of HFA POA and Sanction from CSMC | Rs.4,95,000 /- |
| **Stage 2** | |
| **1.1)** Entry of data from Slum Survey's data verification and cleaning, compilation and collation at zone level (Including cost of data entry and data collation, training of personnel at zone level, cost of hardware for such entry and storage at zone level for Slum-wise and zone wise database). The collation should be able to generate web-enabled city level database and baseline reports for city level technical cell | Rs. 210000/- |
| **2)** Development of city Base Map & Slum Maps using GIS with Carto Sat 1/Car to 11 images | |
| **2.1)** Preparation of Geo-referenced base map (capable of being integrated into GIS platform) of entire urban agglomeration after digitization of different features (including cost of engaging technical partner agencies of NRSC/ISRO) | Rs. 75000/- |
| **2.2)** Conducting total station survey, contour survey, plane table survey & creation of geo-referenced digitized maps for all identified slum pockets and vacant lands in the city (including mapping of basic infrastructure network-in & around slum pockets & plot boundaries based on land titles.) training of ULB survey personnel engaged in directing of slum spatial survey, activities for community mobilization or involvement of NGOs for facilitating spatial surveys etc. | Rs. 200000/- |

| | |
|---|---|
| **2.3)** Cost of integrating the said geo-referenced maps/ spatial data into GIS platform & integrating with socio-economic database/slum MIS to create GIS enabled Slum MIS (This will include cost of engaging technical agency lies), cost of spatial data, large format printer/plotter for printing of maps etc | Rs. 50000/- |
| **3)** Preparation of Slum Redevelopment / Rehabilitation Plans, Zonal Plans and city level slum free plans of action | |
| **3.1)** Analysis of spatial and socio-economic data to create city level spatial and Scio-economic reports to facilitate slum level dialogues for developing slum redevelopment /rehabilitation plans. These works are to be undertaken by reputed consultants in partnership with lead NGOs all to be selected through a transparent process | Rs. 50000/- |
| **3.2)** Activities for dissemination of information and dialogues with different stakeholders (including slum communities by engagement of NGOs/CBOs to guide/anchor community mobilization for slum redevelopment/rehabilitation plans in each slum/zone) | Rs. 50000/- |
| **3.3)** Detailed works for the preparation of slum free city plans with slum level spatial reconfiguration, socio-economic plans, project level details etc. These works are to be undertaken by reputed consultants in partnership with reputed NGOs both to be selected through a transparent process | Rs. 100000/- |
| **Component 2 :**<br>**A)** Demand Survey of all non–slum dwellers (Beneficiaries as per guidelines of PMAY) | Rs. 35/- |
| **B)** The rate for preparation of DPR%. | 0.48% |
| **C)** Rate for Preparation of HFA POA & sanction from CSMC | Rs.4,95,000 /- |
| **Component 3 :**<br>**A)** Demand Survey of all non–slum dwellers (Beneficiaries as per guidelines of PMAY) | Rs. 35/- |
| **B)** The rate for preparation of DPR% | 0.48% |
| **C)** Rate for Preparation of HFA POA and sanction from CSMC | Rs.4,95,000 /- |
| **Component 4 :**<br>**A)** Demand Survey of all non–slum dwellers (Beneficiaries as per guidelines of PMAY) | Rs. 35/- |
| **B)** The rate for preparation of DPR% | 0.48% |
| **C)** Rate for Preparation of HFA POA and sanction from CSMC | Rs.4,95,000 /- |

तरी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घटक क्र.१ ते ४ बाबत लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे POA तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यास शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेणे बाबत एजन्सीच्या नियुक्तीसाठी मागविण्यात आलेल्या निविदा मंजुरी बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय कि,उपरोक्त प्रस्तावास मा.स्थायी समितीची आवश्यकता असलेने अहवालानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल कि,मा.छाननी समितीने शिफारस केल्यानुसार प्रस्तावित "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय कि,यथाप्रस्तावितनुसार मा.प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वासाठी घरे या योजनेच्या अंमलबजावणी करीता व घटक क्र.१ ते ४ बाबत कार्यक्रमाचे बायोमॅट्रीक सर्वेक्षण,POA,DPR, तयार करणे,शासनमान्यता मिळविणे इत्यादी कार्यवाही साठी एजन्सी नियुक्तीची

शिफारस छाननी समितीने मे.स्टेसालाईट ली.या कंपनीची केली आहे.त्यानुसार दर मंजूरीसाठी मा.स्थायी समिती समोर सादर करणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ बाबत लाभार्याचे सर्वेक्षण करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत चा विषय आहे.

मा.श्री. मनोज दुलम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.बाळासाहेब बोराटे :- या बाबतची माहिती सांगा.

प्रकल्प विभाग प्रमुख :- मा.पंतप्रधान आवाय योजने अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ घटक असून या योजनेची वर्तमान पत्रातुन जाहिरात देण्यात आली होती.त्या नुसार १४८०० अर्ज आले आहेत.घटक क्र.१ ते ४ मधील लाभार्थीचे सर्वेक्षण करणे,प्लॅन ऑफ ॲक्शन तयार करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे त्यास शासनाची मान्यता घेणे करीता ई - निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.या कामासाठी एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या असून  मे.स्टेसालाईट ली या एजन्सीचे सर्वात कमी दर असून वाटाघाटी नंतर रू.६ लक्ष च्या ऐवजी ४,९५,०००/- दराने  काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बाराटे :- प्लॅन शासनाकडून मंजूर होवून आल्यानंतर त्याला पैसे दया.

मा.सभापती साहेब :- सदरचा विषय न्यायप्रविष्ठ असल्याने प्रशासनाचे काय मत आहे.

मा.उपायुक्त साहेब : - निविदा मंजूर करण्यास काहीच हरकत नाही.

मा.सभापती साहेब :- प्रशासकीय मता नुसार ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

मा.श्री.गणेश भोसले :-  सार्व .बांधकाम विभागा करीता असलेल्या कामांवर पी.एम.सी.नेमणे बाबत चा विषय या समिती मध्ये घेण्यात यावा जेणे करून सर्व कामे मार्गी लागतील पी.एम.सी. ची नेमणूक न झाल्याने ५६ कोटी रूपयांची कामे थांबलेली आहेत.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- सार्व .बांधकाम विभागातील मुलभुत सोयी सुविधा ,राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान ,१४ व्या वित्त आयोग अंतर्गत कामे,स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत कामे या शासकिय योजनेतील कामे पी.एम.सी.ची नियुक्ती केली नसल्यामुळे प्रलंबीत आहेत.सदरचा प्रस्ताव समिती कडे पाठविलेला पुढील होणा-या स्थायी समिती मध्ये घेतल्यास उशिर होणार असल्याने हा विषय आजच्या समितीमध्ये चर्चेसाठी घेतल्यास कामे तात्काळ मार्गी लागणार आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आजच्या सभेमध्ये हा विषय घेण्यात यावा.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला आहे.अजेंडयावर विषय आलेला नाही.आजच्या सभेमध्ये हा विषय चर्चे करीता घेता येईल.

मा.सभापती साहेब :- या बाबतची माहिती सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- महानगरपालिका सार्व .बांधकाम विभागातील मुलभुत सोयी सुविधा ,राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान ,१४ व्या वित्त आयोग अंतर्गत कामे,स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत कामांकरीता पी. एम. सी.नेमणे बाबत फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार ५ निविदा प्राप्त झाल्या असुन विकास इंडीया कंन्स.प्रा.ली.यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांची पी.एम.सी. म्हणून नियुक्ती करणे बाबत मंजूरीचा विषय आहे.

मा.श्री.मनोज दुलम :-मा. प्रधानमंत्री आवास योजने करीता डी.पी.आर.करून मा.शासनाकडे पाठविणे करीता मे.स्टेसालाईट ली. यांनी नियुक्ती करण्यात यावी. व म.न.पा.सार्व.बांधकाम विभागामधील विविध शासकिय योजना व विकास कामांसाठी पी.एम.सी.म्हणून विकास इंडीया कंन्स्लटींग प्रा.ली.यांची नियुक्त करण्यात यावी.

मा.सौ.छाया तिवारी :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा व विकास कामांसाठी पी.एम.सी.म्हणून विकास इंडीया कंन्स्लटींग प्रा.ली.यांची नियुक्त करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार मा. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ बाबत लाभार्यीचे सर्वेक्षण करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे करीता ई- निविदा क्र. १३९९ मधील नमुद कामांस मान्यता देण्यात येत आहे. व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार व प्रशासनाने केलेल्या मागणीनुसार सार्व .बांधकाम विभागा कडील विविध विकास शासकीय योजना, विविध विकास कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (पी.एम.सी.) नेमणूक करणेच्या ई - निविदा क्र.१४१६ मधील नमुद विकास इंडीया कंन्स्लटींग प्रा.ली.यांची नियुक्त करण्यास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार मा. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घटक क्रमांक १ ते ४ बाबत लाभार्यीचे सर्वेक्षण करणे व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे करीता ई- निविदा क्र.१३९९ मधील नमुद कामांस मान्यता देण्यात येत आहे. व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार व प्रशासनाने केलेल्या मागणीनुसार "अहमदनगर महानगरपालिका सार्व .बांधकाम विभागा कडील विविध विकास शासकीय योजना, विविध विकास कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची (पी.एम.सी.) नेमणूक करणेच्या ई-निविदा क्र.१४१६ मधील" नमुद विकास इंडीया कंन्स्लटींग प्रा.ली.यांची नियुक्तीच्या ऑफिस रिपोर्टला ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज दुलम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०६**

विषय क्रमांक- ८५ शनिवार दिनांक ०३/०९/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा. न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतिने दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट यांची पॅनलशिप मानधनावर नियुक्ती बाबतऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : १) अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४ - २०१५ या वर्षाचे लेखा परिक्षणा मधील अर्धसमास पत्र क्रमांक १६८ दिनांक २१ / ०७ / २०१६ अन्वयेचे पत्र.

२) मा.श्री. श्रीपाद शंकरराव छिंदम , उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे दिनांक २६/०७/२०१६ अन्वयेचे पत्र.

३) संबधित ॲडव्होकेट यांचे नियुक्ती बाबतचे अर्ज.

४) सदर अर्जावरील मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचे निर्देश.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा. न्यायालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतिने दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्होकेट म्हणुन पॅनलशिप मानधनावर नियुक्ती करणे बाबत खालील संबधित ॲडव्होकेट यांनी अर्ज सादर केलेली आहेत. त्याबाबतचा तपशिल पुढिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | राहण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | सौरभ सुभाष काकडे | ३८७६, काकडे सदन, नांगरे गल्ली, आशा टॉकीज समोर, बाळासाहेब देशपांडे हॉस्पिटल जवळ, अहमदनगर |
| २ | आर.डी.येनगंदुल | चेंबर नं. ११६ , जिल्हा न्यायालय कंपौन्ड , अहमदनगर. |
| ३ | अतिश अरुणराव निंबाळकर | चेंबर नं. २०८ , कोर्ट कंपाऊड, जिल्हा न्यायालय, अ. नगर. |
| ४ | स्वप्निल भिमराव काकड पाटील | लॉयर्स चेंबर नं. ११४ ,डिस्ट्रिक्ट कोर्ट कम्पाउंड , अ.नगर. |
| ५ | बी.जी. घोरपडे | चेंबर नं. २१८, जिल्हा कोर्ट कंपाऊड, अहमदनगर. |
| ६ | तुळशीराम बाबर | १०६, लॉयर्स चेंबर्स, जिल्हा न्यायालय कंपाऊंड, अहमदनगर. |
| ७ | शशिकांत बी.रकटे | कायनेटीक इंजि.च्या पाठीमागे, नगर दौंड रोड, अहमदनगर. |
| ८ | मंगेश व्ही. दिवाणे | चौपटी कारंजा, सावरकर पुतळया जवळ, अहमदनगर. |
| ९ | धैयशिल लक्ष्मणराव वाडेकर | साईदंब, पोस्ट कॉलनी, कोहिनुर मंगल कार्यालयापुढे , एकविरा चौक, अहमदनगर. |
| १० | नितिन व्ही. गवारे पाटील | फ्लॅट नं. बी १ पिलीकॅन पार्क, प्लॉट नं. ७८ अ , एन ३ सिडको कॉलनी, औरंगाबाद. |
| ११ | निलेश विजयकुमार देशमुख | फ्लॅट नं. १ , अरविंद चेबर्स, तांगे गल्ली, अहमदनगर. |
| १२ | राहुल एम.पवार | लक्ष्मी नृसिंह कृपा , कोर्ट गल्ली, अहमदनगर. |

सदर अर्जावर मा. महापौर साहेब , अहमदनगर महानगरपालिका यांनी " मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करावा. " असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवर मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पाहत असलेल्या कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यतची नियुक्ती असुन त्यामाहिती बाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्रं. | विधी तज्ञ यांचे नाव | मा.स्था.स.ठ. व दिनांक | नियुक्ती आदेश क्रं. व दि. | कालावधी व सद्यस्थिती मधील मानधन | सद्यस्थितीमध्ये कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲड. श्री.किशोर एन लोखंडे | मा.स्था.स.ठ. क्रं. ४४ दि. ८/७/२०१४ | जा.क्र.आस्था. ७२८३ दि.१६/१/२०१५ | दि.१/८/२००९ पासुन पुढील आदेश होई पर्यत.दरमहा मानधन-रु २०,०००/- | मा.उच्च न्यायालय , औरंगाबाद. |
| २ | ॲड.श्री.व्ही. एस. बेद्रे | मा.स्था.स.ठ. क्रं. १२८ दि. १६/१२/२०१४ | जा.क्र.आस्था. ७२८२ दि.१६/१/२०१५ | दि.१६/१/२०१५पासुन पुढील आदेश होई पर्यत.दरमहा मानधन-रु २०,०००/- | मा.उच्च न्यायालय , औरंगाबाद. |
| ३ | ॲड.श्री.एस.के. पाटील | मा.स्था.स.ठ. क्रं. १२९ दि. १६/१२/२०१४ अन्वये अवगत. | जा.क्र.कोर्ट विभाग ४६४ दि.१३/८/२०१३ ------------- जा.क्र.आस्था. ३०७३ दि.३०/ ७/१४ने नेमणुक रद्द परंतु जा.क्र . आस्था.८५९दि.३० /९/१४ अन्वये जा.क्र३०७३ दि. ३०/७/१४ चे आदेश रद्द करुन पुन्हा पुढील आदेश होई पर्यत कामकाज पहाणे बाबतचा आदेश. | दि.१३/८/२०१४ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहामानधन-रु १२,०००/- | मा.औद्योगिक व कामगार न्यायालय व सहा .आयुक्त कार्यालय, |
| ४ | ॲड. धैयशील लक्ष्मण वाडेकर | मा.स्था.स.ठ. क्रं. ४४ दि. ८/७ /२०१४ | जा.क्र.आस्था. ३०७४ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा. दिवाणी / फौजदारी न्यायालय |
| ५ | ॲड.श्री.प्रसन्ना एम जोशी | मा.स्था.स.ठ. क्रं. ४४ दि. ८/७/२०१४ | जा.क्र.आस्था. ३०७४ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |
| ६ | ॲड.श्रीमती मंगला राजेश कोठारी | मा.स्था.स.ठ. क्रं. ४४ दि. ८/७/२०१४ | जा.क्र.आस्था. ३०७४ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ॲड.श्री.तुळशीराम एकनाथ बाबर | मा.स्था.स.ठ. क्रं. ४४ दि. ८/७/२०१४ | जा.क्र.आस्था. ३०७४ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |
| ८ | ॲड.श्रीमती अनिता व्ही दिघे | मा.स्था.स.ठ. क्रं. ४४ दि. ८/७/२०१४ | जा.क्र.आस्था. ३०७४ दि.३०/७/२०१४ | दि.१/८/२०१४ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |
| ९ | ॲड. सौ. भावना जितेंद्र पलिकुंडवार (कुल्लरवार) | मा.स्था.स.ठ. क्रं. ४५ दि. १२/०१/२०१६ | जा.क्र.आस्था. ८४४७ दि.४/३/२०१६ | दि.१/४/२०१६ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |
| १० | ॲड. सौ. सुचिता आनंद बाबर (वायकर) | मा.स्था.स.ठ. क्रं. ४५ दि. १२/०१/२०१६ | जा.क्र.आस्था. ८४४७ दि.४/३/२०१६ | दि.१/४/२०१६ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |
| ११ | ॲड. प्रसाद दिलिप गांगर्डे | मा.स्था.स. ठ. क्रं. ४५ दि. १२/०१/२०१६ | जा.क्र.आस्था. ८४४७ दि.४/३/२०१६ | दि.१/४/२०१६ पासुन पुढील आदेश होई पर्यत दरमहा मानधन-रु १०,०००/- | मा.दिवाणी / फौजदारी न्यायालय |

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयांमध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता वरील तक्त्यात दर्शविलेल्या कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट म्हणून दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यतच्या पॅनलशिवर नियुक्त्या ह्या दर्शविलेल्या मा. स्थायी समितीच्या वेळोवेळी पारीत झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने निर्णय होवुन करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४ - २०१५ या वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात येत असुन त्यामध्ये अर्धसमास पत्र क्रमांक १६८ दिनांक २१ / ०७ / २०१६ अन्वये " अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये असलेल्या दाव्या संदर्भात कामकाजे पहाणे करीता विधी तज्ञ (कायदेशिर सल्लागार) ॲडव्होकेट यांचे पॅनलशिप मानधनावर नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन अर्ज मागवुन विहीत पध्दतीने कार्यवाही बाबत " नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ; परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ." असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४ - २०१५ या वर्षाचे लेखा परिक्षणामधील अर्धसमास पत्र क्रमांक १६८ दिनांक २१ / ०७ / २०१६ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयांमध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता नव्याने कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट म्हणून पॅनलशिप मानधनावर नियुक्ती करणे बाबत निर्णय झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी करीता निर्णयासाठी पाठविणेस व त्यामध्ये पॅनलशिप नियुक्ती कालावधी व दरमहा मानधन व अटी / शर्ती निश्चिती होवुन सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी मिळाल्यानंतर अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयांमध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता नव्याने कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलशिप नियुक्ती बाबत मुलाखतीसाठी थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार त्याप्रमाणे वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देवुन कार्यवाही करावी लागेल.

तद्नंतर सदर वर्तमान पत्रामधील प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मा. निवड समिती मार्फत उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन निवड इ ाालेल्या ॲडव्होकेट यांची निवड यादी नोटीस फलकावर प्रसिध्द करुन त्याप्रमाणे निवड झालेल्या ॲडव्होकेट यांची नव्याने दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत पॅनलशिपवर नियुक्ती बाबत आदेश निर्गमित करावा लागेल व त्याच वेळेस सद्यस्थितीमध्ये कार्यरत विधी तज्ञ यांची दरमहा मानधन पॅनलशिपवरील यापुर्वीची केलेल्या नियुक्त्या संपुष्टात येत असल्या बाबतचा आदेश संबधितांना निर्गमित करावा लागेल. सदरची वरील विहीत पध्दतीची प्रक्रीया ही एकाच वेळेस होणे तांत्रिक दृष्ट्या योग्य होईल.

उपरोक्त प्रकरणी सदरची बाब ही दरमहा मानधनावरील आर्थिक खर्चाशी संबधित व धोरणात्मक बाब असल्याने या बाबत मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन निर्णय होणे उचित वाटते.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१६ - २०१७ या अंदाजपत्रकामध्ये मानधन या लेखा शिर्षाखाली रुपये १,००,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त संबधितांच्या अर्जाच्या अनुषंगाने व सदरच्या अर्जावर मा. महापौर साहेब यांनी निर्देशित केल्याच्या अनुषंगाने सदर प्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता नव्याने पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधीतज्ञ) अॅडव्होकेट यांची पुढिल आदेश होईपर्यत मानधनावर नियुक्ती बाबत थेट पध्दतीने मुलाखतीसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन मा. निवड समिती मार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेवुन विहीत पध्दतीने कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन मा. स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठविणे करीता मंजुरीसाठी आदेशार्थ सविनय सादर. / " अ "

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी,

यावर मुख्य लेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावरमुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की,"अ" नुसार लेखा परिक्षण करण्यात आले, लेखा परिक्षण त्रुटी निरंक

यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शाक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

-***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून अॅडव्होकेट यांची पॅनलवर नेमणूकी विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.गणेश भोसले :- पहिले सर्व वकील काढणार आहे का? सभापती साहेब अॅड.सौ.भावना पलिकुंडवार या प्रामाणीक वकील आहेत.त्यांना काढू नका.

मा.श्री.दिलीप सातपुते :- अर्ज कोणाकोणाचे आहे ते वाचा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री. सोनवणे :- एकुण १२ अर्ज आहेत महापौर साहेब यांनी शेरे मारून पाठवले आहेत.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव झाल्यानंतर मा.महापौर साहेब व माझ्याकडे काही अर्ज प्राप्त झाले आहेत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- इतरही अॅड.यांचे नियुक्ती बाबत अर्ज प्राप्त होत आहेत.

मा.सभापती साहेब :- नियुक्ती कशी करतात.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- नियुक्तीची प्रक्रिया कशी आहे ते सांगा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- पॅनल नियुक्ती करावयाची असल्यास जाहीरात द्यावी लागेल, अर्ज घ्यावे लागतील. मुलाखती घेवून नियुक्ती करावी लागेल. स्थायी समिती मार्फत नियुक्ती होते.

मा.सभापती साहेब :- प्रलंबित दावे किती ? एवढे लोकांची गरज आहे का ?

मा. प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- दिवाणी दावे ,टॅक्स अपील, उच्च न्यायालयात, औदयागीक न्यायालयात बरेच दावे प्रलंबीत आहेत.वकील लोकांची मुलाखत घेउन त्यांची नेमणूक करावी लागेल.

मा.सभापती साहेब :- पुर्वीच्या नेमणूका कशा केल्या आहेत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- ॲडव्होकेट यांची स्थायी समितीच्या ठरावाने नेमणुक केली आहे.

मा.सभापती साहेब :- यापुर्वी जाहीरातीची प्रोसेस केली नाही.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- त्यावेळीही रिपोर्ट असाच केला होता. पण स्थायी समितीने निर्णय घेतला.

- मा.सभापती साहेब :- म्हणजे स्थायी समितीच्याच निर्णयाने नियुक्ती केली होती.दावे जर प्रलंबित असतील तर वकील आवश्यक आहेत.ॲड.पॅनलवरील मानधन वाढी बाबत माझ्याकडे व प्रशासनाकडे ॲड.श्री.एस.के.पाटील यांचा अर्ज प्राप्त झाला आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- मानधन वाढी बाबत ॲड.श्री.एस.के.पाटील यांचा अर्ज प्राप्त झाला आहे.त्यावर प्रस्ताव तयार करून कार्यवाही चालू आहे.

मा.सभापती साहेब :- त्यांनी किती मानधन वाढीची मागणी केली आहे? त्यांचे सध्याचे मानधन किती आहे?

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- त्यांनी रक्कम नमूद केलेली नाही.मानधना माध्ये वाढ करण्यात यावी असा अर्ज केला आहे. त्यांचे सध्याचे मानधन रक्कम रूपये १२,०००/- आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- त्यांच्या नियुक्ती पासून मानधनात वाढ केली आहे का?

आस्थापना विभाग प्रमुख श्री.सोनवणे :- त्यांची नियुक्ती केल्यापासून अदयापपर्यत मानधनात वाढ केलेली नाही.

मा.सभापती साहेब :- ॲड.श्री.एस.के.पाटील हे जेष्ठ विधीज्ञ असून त्यांचे काम चांगल्या प्रकारे आहे.त्यांच्या मानधनामध्ये रक्कम रूपये ५०००/- वाढ करून त्यांचे एकूण मानधन १७०००/- करण्यात यावे.

मा.सौ. उषा नलवडे :- आहे तेच वकिल कायम ठेवणे,आहे ते वकिल कमी करणे अथवा नव्याने नियुक्ती करणे या बाबत चे सर्व अधिकार सभापतींना दया.

मा.श्री.मनोज दुलम :- मा.सभापती स्थायी समिती यांना कायम ठेवणे, कमी करणे,नविन नियुक्ती करण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत.

मा.सभापती साहेब :- वकिलांच्या नियुक्ती बाबत आपण जे चांगले व कार्यक्षम वकील असतील अशांच्या ॲडव्होकेट पॅनलवर नियुक्या करण्यात येतील.मला प्राप्त अधिकारा नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या ॲडव्होकेट पॅनलवरील मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, येथील काम पहाणारे विधीज्ञ ॲड.श्री.तुळशीराम बाबर यांची नियुक्ती वगळून इतर विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.मा.ॲडव्होकेट पॅनलवर ॲड. श्री. शशिकांत बी.रकटे, ॲड.श्री.मंगेश दिवाणे, ॲड.श्री.राहूल एम.पवार, ॲड. श्री.सौरभ सुभाष काकडे, श्री. आर .डी. येनगंदूल, ॲड.श्री.निलेश विजयकुमार देशमुख या वकीलांच्या नव्याने नियुक्त्याकरण्यात याव्यात व ॲड.श्री.तुळशीराम बाबर, यांची मानद नियुक्ती कायम ठेवण्यात यावी.या नियुक्त्या पुर्वीच्या मानधनावर करण्यात याव्यात.

तसेच मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ  ॲड.श्री.किशोर लोखंडे व ॲड.श्री.व्हि.एस.बेंद्रे यांची मानद नियुक्ती कायम ठेवण्यात यावी. मा.औदयोगीक व कामगार न्यायालय येथील कामकाज पहाणारे विधिज्ञ ॲड.श्री.एस.के. पाटिल यांची नियुक्ती कायम ठेवण्यात यावी.ॲड.श्री.एस.के. पाटील यांनी प्रशासनाकडे मानधनात वाढीबाबत त्यांनी केलेल्या मागणी नुसार सध्या देण्यात येणा-या मानधनात प्रशासकिय पातळीवर योग्य ती वाढ करण्यात यावी.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणूकी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१) मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, येथील काम पहाणारे विधीज्ञ ॲड.तुळशीराम बाबर यांची नियुक्ती वगळून इतर विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) ॲड.श्री.तुळशीराम बाबर यांची मानद नियुक्ती कायम ठेवून मा.ॲडव्होकेट पॅनलवर ॲड. श्री. शशिकांत बी.रकटे, ॲड.श्री.मंगेश दिवाणे, ॲड.श्री.राहूल एम.पवार, ॲड.श्री.सौरभ सुभाष काकडे, ॲड. श्री. आर .डी. येनगंदूल,  ॲड.श्री.निलेश विजयकुमार देशमुख  यांची यापुर्वीच्या मानधनानुसार (प्रती मानद विधीज्ञ रक्कम रु.१०,०००/- प्रमाणे) मानद विधीज्ञ म्हणुन नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.मा.औदयोगीक व कामगार न्यायालय  येथील कामकाज पहाणारे विधिज्ञ ॲड.श्री.एस.के. पाटील यांची नियुक्ती कायम ठेवण्यात यावी. ॲड.श्री.एस.के.पाटील यांच्या मानधनामध्ये रक्कम रूपये ५०००/- वाढ करून त्यांचे एकूण मानधन १७०००/- करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

३) मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ ॲड.श्री.किशोर लोखंडे व ॲड.श्री.व्हि.एस.बेंद्रे यांची मानद नियुक्ती कायम ठेवून ॲड. श्री.नितीन व्ही.गवारे यांची रक्कम रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार ) या मानधनावर नव्याने नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. उषा नलवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज दुलम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका